# प्रकरण पाचवे

# उ प सं हा र

# प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

जाती व वर्णव्यवस्था हे हिन्दू समाजाचे एक मूलभूत वैशिष्टय आहे. अगदी प्राचीन काळात हिन्दू समाजाची विभागणी उच्च-निच वर्णानुसार निश्चित झाली. परंतु गुण व कर्म यानुसार श्रमविभाजन करणारी व्यवस्था असे वर्णव्यवस्थेचे स्वरूप होते. कालांतराने वर्णव्यवस्थेची जागा जातिव्यवस्थेने घेतली. परंतु तिने वर्णव्यवस्थेची चौकट मात्र कायम ठेवली. काळानुसार जातिसंस्थेच्या स्वरूपात अनेक स्थित्यंतरे घडून आली. अनेक जातिबंधाने निर्माण झाली. विशेषत: मुसलमानी आक्रमणाच्या काळात रक्त व वंशशुध्दी राखण्यासाठी अन्नोदक व्यवहार बंदी, जात्यंतर्गत विवाह रूढी अशी अनेक जातिबंधाने निर्माण झाली. त्यातून जातिसंस्थेचे स्वरूप हळूहळू पण निश्चतपणे विकृत व बंदिस्त बनत गेले. अन्याय व विषमता यांच्या पायावर उभा असलेला जातिनिष्ठ हिन्दू समाज सतत विघटीत व पराभूत होत गेला. प्राचीन व मध्ययुगीन काळात जातिसंस्थेविरूध्द आणि शूद्रातिशूद्रांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी भक्ती आंदोलने उभारली गेली. परंतु ते प्रयत्न सर्वार्थाने यशस्वी झाले नाहीत.

ख-या अर्थाने जातिसंस्थेचा शास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास १९व्या शतकात विशेषत: ब्रिटीश राजवटीत होऊ लागला. ब्रिटीश राजवटीचे परिणाम केवळ राजकीय क्षेत्रावरच नव्हे तर समाज, धर्म, व संस्कृती यावरही झाले. त्यामुळे केवळ नवशिक्षितांच्या वर्गातच वैचारिक परिवर्तन झाले असे नव्हे तर उच्च ब्राह्मणवर्गही गोंधळून गेला. सनातनी परंपराभिमान्यांनी हिन्दू धर्म, जाती व वर्णव्यवस्था यांचे समर्थन केले. तर नवशिक्षितांच्या वर्गाने हिन्दू धर्माची व जातिव्यवस्थेची मूलगामी तसेच बुध्दीवादी चिकित्सा करून त्यात परिस्थितीनुसार बदल करण्याची

आवश्यकता सांगितली. परंपराभिमानी व नवशिक्षितांची पिढी यांच्यातील वाद-प्रतिवादातून जातिव्यवस्थेविषयक अभ्यासाला चालना मिळाली.

जातिव्यवस्थेचा अभ्यासपूर्ण दृष्टीकोनातून विचार करणारे स्वा. वि.दा. सावरकर हे एक थोर विचारवंत व नेते होते. सबळ व संघटित हिन्दू राष्ट्राची निर्मिती हे त्यांच्या समाजकारणाचे व राजकारणाचे मुख्य ध्येय होते. १९२७ ते १९३२ या काळात सामाजिक कार्य करीत असताना त्यांनी जातिभेद निर्मूलन व अस्पृश्यता निवारण या दोन उद्दिष्टांवर विशेष भर दिला. त्यांनी जातिव्यवस्थेत असलेले सप्तदोष सांगून ते हिन्दू समाजाच्या ऱ्हासास कसे कारणीभूत झालेले आहे याचे विवेचन केले आहे. यासंदर्भात त्यांनी अशी भूमिका होती की मानीव व पोथीजात जातिभेद नष्ट केल्यास अस्पृश्यता व जातिभेद यामुळे विघटीत व दुर्बल झालेल्या हिन्दू समाजात ऐक्य व संघटन निर्माण होईल. यास्तव त्यांनी जन्मनिष्ट जातिभेद उच्छेदण्याच्या मुद्दयावर भर दिला. त्या अनुषंगाने "जन्मजात जातिभेदाचा उच्छेद व गुणजात जातिभेदाचा उध्दार" असा चातुवर्ण्य व्यवस्थेचे पुनरूज्जीवन करणारा विचार मांडला.

सावरकरांनी जाति-जातींमधील भेद नष्ट करून हिन्दू समाजातील सर्व घटकांना "हिन्दुत्वा"च्या एका समान सूत्रात बांधण्याचा प्रयत्न केला.

समाजकारणाप्रमाणेच त्यांच्या राजकारणाला देखील "हिन्दूराष्ट्र" निर्मितीचे अधिष्ठान प्राप्त झाले होते. १९३७ नंतर त्यांनी पक्षीय राजकारणात सक्रीय सहभाग घेतला. हिन्दु महासभा या पक्षाद्वारे आपले राजकीय उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

जातीतीत जाऊन विचार करणारे व कार्य करणारे अनुयायी मिळाले नाहीत. त्यामुळे त्यांच्या हिन्दुत्ववादी तत्त्वज्ञानाचा प्रभाव व व्याप्ती मर्यादित राहिली.

सावरकरांप्रमाणेच डॉ. आंबेडकरांचे सामाजिक व राजकीय कार्य जातिप्रथा निर्मूलन व अस्पृश्यता निवारण या ध्येयाने प्रेरित झालेले होते. एका बाजूने त्यांनी हिन्दू धर्माचे विषम व अन्यायकारक स्वरूप, ब्राह्मण वर्गाचे धर्मग्रंथांचे वर्चस्व, पुरोहितशाही यांना सतत विरोध केला आणि अस्पृश्य वर्गाला इतर वर्गाच्या बरोबरीने हक्क मिळवून देण्यासाठी लढा दिला त्यांच्या सामाजिक कार्यात महाडचा सत्याग्रह, नाशिक मंदिर प्रवेश, पर्वती सत्याग्रह या विशेष उल्लेखनीय घटना आहेत. त्याद्वारे त्यांनी अस्पृश्य वर्गात हक्कांविषयी जाणीव निर्माण केली.

दुसऱ्या बाजूने त्यांनी हिन्दू धर्माची, धर्मग्रंथांची मूलगामी चिकित्सा करून त्यांचे समाजावरील वर्चस्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्यामागे अखिल मानव जातीला धर्मग्रंथांच्या दास्यातून मुक्त करण्याचा त्यांचा हेतू होता. तसेच जाती-जातीतील भेद नष्ट करून जातिविरहीत अशा नव्या समाज रचनेची कल्पना त्यांनी मांडली.

१९३२ नंतर डॉ. आंबेडकर सामाजिक समता प्रस्थापित करण्याच्या उद्दिष्टाकडून राजकीय सत्ता प्राप्तीच्या उद्दिष्टाकडे वळले. सर्व माणसे जन्मत: समान आहेत व ती मरेपर्यंत समान रहावीत. त्यांचे जन्मसिद्ध मानवी हक्क कायम रहावेत म्हणून प्रयत्न करणे हा त्यांच्या राजकारणाचा मुख्य हेतू होता. अस्पृश्यांना समतेचे हक्क मिळवून देण्यासाठी त्यांना राजकीय सत्तेत न्याय्य वाटा मिळावा यासाठी त्यांनी रिपब्लीकन पार्टी, स्वतंत्र मजूर पक्ष आणि शेड्युल्ड कास्ट फेडरेशन

या राजकीय पक्षांची स्थापना केली. या संदर्भात ते एका सभेत म्हणाले की, अस्पृश्यांना स्वतःचा उध्दार करण्याचा एकच मार्ग आहे तो राजकारण निर्बंध किंवा कायदा करण्याची सत्ता हाती घेणे हा होय.[१] या राजकीय पक्षांद्वारे त्यांनी अस्पृश्य वर्गाची सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक स्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न केले. अर्थात डॉ. आंबेडकरांचे सामाजिक तसेच राजकीय कार्य विशिष्ट वर्ग किंवा जातीपुरते मर्यादित न राहता ते अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी होते.

बॅ. वि.दा. सावरकर व डॉ. आंबेडकर यांच्या जातिनिर्मूलनविषयक विचारांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की दोघांची अस्पृश्यता निवारण व जातिभेद निर्मूलन ही ध्येये किंवा उद्दिष्टये समान होती. मात्र ही ध्येये साध्य करण्याचे दोघांचे मार्ग किंवा साधने यात थोडीफार तफावत होती. सावरकर व आंबेडकर आपापल्या वैचारिक भूमिकेनुसार आवश्यक त्या साधनांचा अवलंब करुन आपल्या मार्गाने गेले. जातिभेद निर्मूलनाची गरज दोघांनीही मान्य केली. परंतु सावरकरांना समर्थ व संघटित हिन्दू राष्ट्राच्या निर्मितीसाठी जातींचा उच्छेद करण्याची आवश्यकता वाटते. तर सर्व माणसे समान असावीत व त्यांना समान हक्क मिळावेत यासाठी जातींचा उच्छेद करण्याची गरज डॉ. आंबेडकरांना वाटते. थोडक्यात सावरकरांनी हिन्दु राष्ट्रवादी दृष्टीकोनातून तर आंबेडकरांनी मानवतावादी भूमिकेतून जातिनिर्मूलनाची गरज सांगितली.

हिन्दू समाज एकसंघ करण्याचे सावरकरांचे ध्येय होते. परंतु जाति निर्मूलन व हिन्दुराष्ट्र संघटनेच्या कार्यात घिसडघाई करु नये. पायरी-पायरीने हे कार्य करावे अशी त्यांची भूमिका होती. त्यासाठी सत्य-नारायण, सहभोजने, अखिल हिन्दू गणपती उत्सव आणि विवाहासारख्या गोष्टीत अनुलोमता व अनुवंशिकता या मुद्दयांवर त्यांनी भर दिला. तर डॉ. आंबेडकरांना या घडीस जातिनिर्मूलन झाले पाहिजे असे वाटत होते.

जातिसमस्या सोडविण्यासाठी त्यांना प्रस्थापित मूल्यव्यवस्थेविरुद्ध बंड करण्याचा, चळवळ करण्याचा मार्ग योग्य वाटतो. समाजव्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी विद्रोह करण्याची भाषा आंबेडकर वापरतात. समाजव्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी हिन्दूधर्मग्रंथांची कठोर मीमांसा करण्याची आवश्यकता त्यांना वाटते. वरीष्ठ जातींचे हितसंबंध, त्यांचे प्रामाण्य अमान्य करून सर्वांना समान हक्क मिळवून देण्याच्या मुद्दयावर आंबेडकर भर देतात. तर जुने धर्मग्रंथ विज्ञानाच्या कसोटीवर पारखून घ्यावेत आणि त्यातील जे उपयुक्त व अनुकूल तेच स्वीकारावे आणि अयोग्य ते टाकून द्यावे असे सावरकरांना वाटते. ते म्हणतात, "श्रुतिस्मृति पुराणादी सारे ग्रंथ आम्ही कृतज्ञ आदराने सन्मानतो पण ते ऐतिहासिक ग्रंथ म्हणून. अनुल्लंघनीय धर्मग्रंथ म्हणून नव्हे."[२] म्हणजे त्यांचा भर विज्ञानवादावर होता.

थोडक्यात बॅ. सावरकर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जातिनिर्मूलनाच्या कार्यात एक सूत्रता निर्माण होऊ शकली नाही. ते दोघे आपापल्या स्वतंत्र मार्गाने गेले. डॉ. आंबेडकरांचा धर्माकडे पाहण्याचा शुध्द बुध्दीवादी दृष्टीकोन समाजसुधारणेचे कार्य करणाऱ्या सावरकरांना मानवणारा नव्हता. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वत्रयींवर धर्मनिरपेक्ष भारताची पुनर्रचना करण्याचा डॉ. आंबेडकरांचा विचार सावरकरांना मान्य होण्यासारखा नव्हता. जुन्या धर्मग्रंथांचे नवे अर्थ लावण्यावर त्यांचा विशेष भर होता. जाती व वर्णव्यवस्थेने हिन्दू समाज व राष्ट्र यांचे अपरिमित नुकसान केले आणि जाती व वर्ण व्यवस्था हिन्दूंच्या पराभवास व पारतंत्र्यास कारणीभूत झालेली आहे. हे डॉ. आंबेडकरांचे विचारही सावरकरांना मान्य नव्हते. तर त्यांना हिन्दूंचा इतिहास गौरवशाली व वैभवशाली आहे असेच वाटते.

डॉ. आंबेडकरांना हिन्दू समाजव्यवस्थाच विकृत वाटत होती. त्यांच्या मते, ही विकृती केवळ प्रत्यक्ष जीवनातच नाही तर वैचारिक व तत्त्वज्ञानाच्याही क्षेत्रात निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांनी हिन्दू समाजातील जातिय विकृतीवर, जातियतेला आधार देणा-या धर्मावर व धर्मग्रंथांवर टीका केली. ते म्हणतात, वर्णव्यवस्था वंश-परंपरेवर आधारित करण्यासाठी म्हणजेच वर्ण व त्यातून जाती निर्माण करण्यासाठी धर्माचा साधन म्हणून उपयोग केला गेला. परंतु सावरकरांच्या मते, मूळात हिन्दू धर्म विकृत नाही. त्यामुळे त्यांनी धर्मतत्त्वांची बदलत्या काळानुसार पुनर्रचना करण्याचा विचार मांडला आहे.

## टीकात्मक विवेचन:

बॅ. वि.दा. सावरकरांच्या जातिनिर्मूलनाच्या विचारांचे महत्त्व मान्य करूनही त्यातील दोष किंवा उणीवा लक्षात घ्याव्या लागतात. त्यांचे सामाजिक व जातिनिर्मूलनाचे विचार प्रतिक्रियात्मक राष्ट्र वादावर आधारलेले, जातिसमस्येच्या आर्थिक स्वरूपाकडे दुर्लक्ष करणारे, हिन्दुत्वाचा आग्रह धरणारे, सामाजिक विषमतेच्या उच्चाटनाची मूलगामी चिकित्सा न करणारे, बुध्दीपेक्षा भावनेला आव्हान करणारे आणि केवळ हिन्दूंच्या ऐक्यावर भर देणारे असल्यामुळे या देशातील जातियविषमतेची विषवल्ली निपटून काढण्यासाठी ते उपयोगी पडत नाहीत. हिन्दू राष्ट्राच्या संकल्पनेला केंद्रस्थानी मानल्यामुळे त्यांच्या विचारांमध्ये अनेक उणीवा निर्माण झाल्या.[3]

त्यांचे सामाजिक कार्य केवळ रत्नागिरी शहरापुरते मर्यादित राहिले. त्यामुळे त्यांच्या जातिनिर्मूलनाच्या कार्याची, वैज्ञानिक दृष्टीची खरी ओळख सर्वांना होऊ शकली नाही. त्यांच्या जीवनातील महत्त्वांच्या काही घटनांविषयीच स्थूल परिचय नव्या पिढीला झाला. त्यांचे सप्तबंदी

विरोधी कार्य ग्रामीण भागात पोहोचू शकले नाही.

असे असले तरी त्यांनी सुमारे बारा वर्षे जातिनिर्मूलनाचे कार्य अत्यंत कळकळीने केले आणि अस्पृश्य व पूर्वास्पृश्यांना हिन्दू राष्ट्राच्या व्यापक कल्पनेत समाविष्ट करण्याचा विधायक प्रयत्न केला.

डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यता ही मूर्तिमंत असमानता आहे व अशी प्रथा हिन्दू धर्म व हिन्दू समाज याशिवाय कुठेही आढळणार नाही असे सांगून गुलामगिरीविरुद्ध बंड करण्याचे व समान हक्क प्राप्त करून देण्याचे कार्य केले.

सद्यकालीन महत्त्व:

बॅ. सावरकरांच्या तत्त्वज्ञानात समाजजीवनाला तसेच राष्ट्रजीवनाला समर्थ, निकोप, प्रवाही बनविणारे गुणविशेष आढळून येतात. त्यांनी समाजाला विधायक, पुरोगामी व रचनात्मक विचार दिले. तसेच शास्त्रीय प्रवृत्ती, समतावादी आणि भविष्यवेधी विचार प्रतिपादन याद्वारे नव्या समाज रचनेची कल्पना त्यांनी समाजासमोर ठेवली आहे. सावरकरांनी जात्यतीत समाजाचा मांडलेला नव्या समाजरचनेचा विचार परंपरानिष्ठ हिन्दू समाजाला आधुनिकतेकडे घेऊन जाण्यासाठी उपयुक्त ठरणारा आहे. वास्तविक परंपरा व आधुनिकता या दोन भिन्न संकल्पना आहेत. सावरकरांनी परंपरेतील योग्य मूल्ये जतन करून आधुनिकतेकडे प्रवास कसा करावा याचे मार्गदर्शन केले आहे. या प्रवासात जे उपयुक्त आहे ते बरोबर घ्यावे आणि जे अडचणीचे आहे ते टाकून द्यावे, असा परंपरा व आधुनिकता यांची सांगड घालणारा विचार त्यांनी समाजाला दिला आहे. याद्वारे धर्म व संस्कृती यातील त्याज्य आणि स्वीकारार्ह काय आहे याचे मार्गदर्शन केले आहे. वैभवशाली व गौरवशाली

हिन्दू संस्कृतीचा वारसा जतन करण्याची आणि नव्या उच्च व आदर्श तत्त्वांचा स्वीकार करून तिला आधुनिक बनविण्याची एक व्यावहारिक तडजोड त्यांनी सुचविली आहे. यादृष्टीने बॅ.वि.दा. सावरकर यांचे तत्त्वज्ञान आजही समाजाला प्रेरक व मार्गदर्शक ठरले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे या संदर्भातील विचार व त्यांचे महत्त्व वादातीत आहे. त्यांनी मानवतावादी भूमिकेतून मांडलेले विचार हिन्दू समाजाला व राष्ट्राला उपयुक्त ठरले आहे. डॉ. आंबेडकरांचे समाज सुधारणे विषयीचे विचार व त्यादृष्टीने केलेली चळवळ केवळ समाज सुधारण्याची चळवळ नव्हती. तसेच ती समाज प्रबोधन व हक्क प्राप्ती यासाठीही नव्हती. तर धर्म सुधारणा व त्याआधारे समाज सुधारणा करण्यासाठी आणि माणसाला माणूस म्हणून जाण्याचा समान हक्क प्राप्त करून देण्यासाठी ही चळवळ होती. तसेच ती पतितोध्दाराची व लोकसंग्रहाची चळवळ होती. धर्म व समाज सुधारणेतून राजकीय स्वातंत्र्य, सत्तांतर व नव्या राजकीय आदर्शांची व मूल्यांची निर्मिती असे त्यांच्या कार्याचे स्वरूप व उद्दिष्ट होते. या उद्दिष्टपूर्तीसाठी त्यांनी सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात बदल घडवून आणण्याची गरज हिन्दू समाजाच्या नजरेस आणून दिली.

स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वत्रयीवर डरली आहे. सामाजिक समस्या सोडविण्याच्या दृष्टीने तिचे महत्त्व मोठे आहे. भारताच्या शासन-कर्त्यांनादेखील त्यांच्या विचारांचा घटनेत समावेश करून ते प्रत्यक्षात आणण्याची बांधिलकी स्वीकारली आहे. यातच त्यांच्या विचारांचे महत्त्व व मोठेपण सामावलेले आहे.

अशा प्रकारे गुलामगिरीची चीड असलेला कोणताही समाज संघर्षासाठी तयार होतो. परंतु त्यासाठी त्या समाजात प्रबोधन घडवून आणावे लागते. हे प्रबोधन करण्यासाठी आंबेडकरांनी आपल्या सखोल व दीर्घ चिंतनातून सम्यक् परिवर्तनाचे तत्त्वज्ञान सांगितले.

.....

## प्रकरण पाचवे

## उ प सं हा र

१. कीर धनंजय - डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृ.क्र. २४१

२. फडके भालचंद्र - फुले आणि आंबेडकर पृ.क्र. ५२
शोध आणि बोध

३. प्रा. डॉ. द.ता. भोसले:
- सावरकरांचे सामाजिक कार्य - एक चिंतन"
पृ.क्र. १२१

"स्वातंत्र्यवीर" सावरकरांच्या तेजस्वी जीवनावरील अलौकिक विशेषांक - संपादक - मुकुंदराव किर्लोस्कर व शंकर पाटील २१ जुले १९८६, पुणे.

.....

## - संदर्भ ग्रंथ सूची -


**प्राथमिक साधने:**

१) आंबेडकर, भी.रा. - जातिसंस्थेचे उच्चाटन (अनु.) मून वसंत - मनोविकास प्रकाशन, मुंबई १९८६.

२) आंबेडकर, भी.रा. - जातिसंस्थेची उत्पत्ती

३) सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर वाङ्मय खंड ३, १९६४

४) सावरकर, वि.दा. - समग्र सावरकर वाङ्मय खंड ४, १९६५

५) सावरकर, वि.दा. - इतिहासाची सहा सोनेरी पाने, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९८६.

६) सावरकर, वि.दा. - माझी जन्मठेप - परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई, १९८७.

**इतर ग्रंथ:**

१) कर्वे, द.गो. - स्वतंत्र भारताचे द्रष्टे न्या.रानडे (अनु.) गो.म. कुलकर्णी, आर्यभूषण मुद्रणालय, पुणे-४, १९४२.

२) कसबे, रावसाहेब - आंबेडकर आणि मार्क्स - सुगावा प्रकाशन, पुणे-३०.

३) कीर, धनंजय - डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७.

४) कीर, धनंजय - स्वातंत्र्यवीर सावरकर (अनु.) धांबेटे द.पां. पॉप्युलर प्रकाशन मुंबई, १९७२.

५) कीर, धनंजय - Savarkar and His Times - A.R. Keer, Bombay, 1950.

६) केळकर, भा.कृ. - समाजसुधारक सावरकर - अस्मिता प्रकाशन, पुणे-१९८३.

७) खैरमोडे, चां.भ. - डॉ.भीमराव रामजी आंबेडकर चरित्र खंड-३, प्रताप प्रकाशन, मुंबई, १९६४.

८) खोले विलास (सं.) - सूर्यबिंबाचा शोध स्वातंत्र्यवीर सावरकर गौरविका.

९) गणवीर, रत्नाकर - (सं.) "बहिष्कृत भारता"तील डॉ. आंबेडकरांचे स्फुटलेख - रत्नमित्रा प्रकाशन - भुसावळ,१९८१.

१०) गणवीर, रत्नाकर (सं.)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख - रत्नमित्रा प्रकाशन, भुसावळ.

११) गावडे, प्र.ल. - सावरकर एक चिकित्सक अभ्यास - स्वाध्याय महाविद्यालय, पुणे, १९७०.

१२) प्रा. गांजरे, मा.फ. - डॉ. बाबासाहेबांची भाषणे खंड-२, अशोक प्रकाशन, प्रबुद्धनगर-नागपूर-३.

१३) गोखले, श्री.पु. - अशी गर्जली वीरवाणी, लोकमान्य प्रकाशन, पुणे, १९६९.

१४) जाधव, रा.ग.(सं.) - जोशी लक्ष्मणशास्त्री यांचे निवडक निबंध, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७५.

१५) जावडेकर, श.द. - आधुनिक भारत, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९३८.

१६) जोशी, लक्ष्मणशास्त्री- लेखसंग्रह खंड पहिला, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १९८२.

१७) जोशी लक्ष्मणशास्त्री - वैदिक संस्कृतीचा इतिहास, प्रज्ञा पाठशाळा, वाई, १९७२.

१८)

१९) डांगे, श्री.अ. - बारा भाषणे, अभिनव प्रकाशन, मुंबई, १९७६.

२०) बोबडे,प्रकाश - भारतीय समाजरचना: पारंपरिक व आधुनिक श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, १९८४.

२१) डॉ.फडके, भालचंद्र - डॉ. आंबेडकर आणि दलित साहित्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८९.

२२) डॉ.फडके भालचंद्र - डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८५.

२३) डॉ.फडके, भालचंद्र - फुले आणि आंबेडकर, शोध आणि बोध, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, १९८५.

२४) डॉ.फडके,य.दि. -व्यक्ति आणि विचार, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १९७९.

२५) फडके, य.दि. - शोध सावरकरांचा, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १९८४.

२६) फडके, य.दि. - तत्वज्ञ सावरकर,-निवडक विचार मराठी तत्वज्ञान महाकोश मंडळ, पुणे-४, १९८६.

२७) फाटक, न.र. - अर्वाचीन महाराष्ट्रातील सहा थोर पुरूष,

२८) माटे, श्री.म. - विचार शलाका, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७०.

२९) प्रा.मोरे, शेषराव - सावरकरांचा बुध्दीवाद, निर्मल प्रकाशन, नांदेड-२, १९८८.

३०) सरदार, गं.बा. – संतवाङ्मयाची फलश्रुती, श्री.विद्या प्रकाशन, पुणे, १९८२.

३१) सरदार, गं.बा. – प्रबोधनातील पाऊलखुणा– (संपा.) निर्मलकुमार फडकुले, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७८.

३२) सहस्त्रबुध्दे, पु.ग. – केसरीच्या त्रिमूर्ती, केसरी प्रकाशन, पुणे, १९७४.

३३) सुमंत यशवंत व धुंडे, दत्तात्रय (सं.) – महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे–३०, १९८८.

३४) मराठी विश्वकोश खंड–२, महाराष्ट्र मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

३५)

लेख:

१) डॉ. आंबेडकरांचा सामाजिक प्रतिकाराचा सिध्दांत, नवभारत, सप्टेंबर १९८३.

२) Dr. Kavalekar K.K. & Chousalkar Ashok S. Edited - Political Ideas and Leadership of Dr.Ambedkar Vishwaheel Publications, Pune, 1989.

३) चौसाळकर अशोक - "विष्णुशास्त्री चिपळूणाकर यांच्या विचारांचे
स्वरूप" - नवभारत, जानेवारी, १९८७.

४) दावरे, रमेश - माणगाव परिषद, हिरक महोत्सव स्मरणिका,
कोल्हापूर, १९८४.

५) डॉ.देशपांडे,स.ह.- पारमार्थिकांनी केलेला सावरकरांचा पराभव,
मौज, दिवाळी, १९८९.

६) स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनावरील अलौकिक विशेषांक,
संपा. मुकुंदराव किर्लोस्कर व शंकर पाटील,
२१ जुले, १९८६, पुणे.

.....